MHRT050004302017

**नियमित दिवाणी दावा क्र. ६१/२०१७ मधील**

**निशाणी ५९ खालील आदेश**

**श्रीमती सुमती कृष्णा मिरजकर**

**वि.**

**श्री. कृष्णा भाग्या सुतार**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी त्यांच्याविरुध्दचा झालेला **''पुरावा बंदचा''** आदेश रद्द होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जातील कथनाप्रमाणे प्रस्तुतकामी दि. २०.०८.२०२४ रोजी वादीचा पुरावा न्यायालयाने बंद केला आहे. वादी यांनी सदर दाव्याच्या कामी साठेकरारपत्राच्या अनुषंगाने दुय्यम निबंधक खेड यांची साक्ष नोंदवण्याची आहे त्याकरीता वादी यांना पुराव्याची संधी देणे आवश्यक आहे. वादी यांना पुढील पुरावा देण्यास संधी न मिळाल्यास त्यांचे पैशाने न भरून येणारे अपरिमित नुकसान होणारे आहे यास्तव वादीविरुध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द होवून मिळण्याकरीता सदर अर्जाद्वारे विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादीचा पुरावा बंद झालेला आहे. वादीने पुर्वी साठेकरारपत्र शाबित करणे गरजेचे होते. सबब, सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा.

०४. अर्ज, म्हणणे व प्रकरणाचा अभिलेख पाहिला. दोन्ही बाजूच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी दि.१०.०४.२०२२ रोजीच्या

साठेकरारपत्राप्रमाणे दावा मिळकतीचे खरेदीखत करून देण्याकरिता व कब्जा व मालकी हक्क कायम करण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुतचे प्रकरणी दि. २०.०६.२०२० रोजी मुद्दे निश्चीत केले आहेत. तद्नंतर दि. २१.१०.२०२२ रोजी वादी यांनी पुराव्याचे शपथपत्र दाखल करून दि. २७.०६.२०२४ रोजी त्यांची साक्ष नोंदवण्यात आली आहे. तद्नंतर वादी यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी पुरावा दिला नसल्याने त्यांचा पुरावा दि. २०.०८.२०२४ रोजी आदेश करुन बंद करण्यात आला होता. सदरचा आदेश रद्द करण्याची मागणी प्रस्तुत अर्जाद्वारे वादींनी मागणी केली आहे.

०६. वादी यांनी साठेकरारपत्राच्या आधारे खरेदीखत पूर्ण करून देण्याची मागणी केली आहे. त्याअनुषंगाने त्यांना अधिक पुरावा द्यायचा आहे. वादी यांना पुरावा देण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वादी यांना त्यांची बाजू पटलावर आणण्याकरीता एक संधी देणे आवश्यक वाटते. वादी यांना अधिक पुरावा देण्याची संधी न दिल्यास त्यांची बाजू पटलावर येणार नाही. वादी यांच्याविरुध्द झालेला 'पुरावा नाहीचा' आदेश रद्द केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी यांचा पुरावा पटलावर आल्यास दाव्याचा निकाल नैसर्गिक न्यायतत्वानुसार होणार आहे. परंतु याबरोबरच वादी यांनी पुरावा न दिल्यामुळे सदरचे प्रकरण हे काहीकाळ प्रलंबित राहिले आहे. त्याचा विचार करता वादी यांना कॉस्ट करणे उचित राहिल असे मला वाटते. सबब, वरील सर्व कारणांचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## आदेश

०१. वादी यांचेविरुध्द झालेला 'पुरावा नाहीचा' आदेश रक्कम रु.५०० इतकी कॉस्ट हा प्रतिवादीला देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

०२. वादी यांनी कॉस्टची रक्कम प्रतिवादीला पुढील तारखेस न दिल्यास पुरावा नाहीचा आदेश पुर्ववत करण्यात येईल.

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2025.03.15 16:49:38 +0530

**(मनिषा म. पाटील)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खेड,**
**ता. खेड, जि. रत्नागिरी**

**दिनांकः १३.०३.२०२५**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No. 61/2017 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order. | | |
| Name of Stenographer | : | Smt.S.K.Kharat |
| Court Name | : | 2nd Jt. CJJD & JMFC, Khed |
| Date of Decision | : | 13.03.2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 13.03.2025 |
| Order uploaded on | : | 15.03.2025 |